शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्परीक्षित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-4025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. [illegible])
वर्ष तेरावे : अंक पंचवीस – सव्वीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" -
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

**पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव**

● Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC ● [illegible] ●

ता. तासगाव, जि. सांगली



# लोकसंस्कृतीची आविष्कार रूपे

142

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे नियतकालिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष दहावे : अंक पंचवीस व सव्वीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

# लोकसंस्कृतीची आविष्कार रुपे

**संपादक**

**प्रा.(डॉ.)शिवकुमार सोनाळकर**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

**अतिथी संपादक**

**डॉ.मिलिंद हुजरे**

प्राचार्य, पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि.सांगली

**डॉ.तातोबा बदामे** **डॉ.शहाजी पाटील**

**कार्यकारी संपादक**

डॉ.नीला जोशी

**संपादक मंडळ**

प्रा.(डॉ.)नंदकुमार मोरे डॉ.गोमटेश्वर पाटील डॉ. तातोबा बदमे डॉ.दिनेश वाघुंबरे

**सल्लागार समिती**

डॉ. राजन गवस डॉ. प्रकाश कुंभार डॉ. डी. ए. देसाई डॉ. अनिल गवळी

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११

**मुद्रक**

देशमाने ऑफसेट,

औद्योगिक वसाहत, पलूस, (जि. सांगली) ४१६ ३१०, मो. ९९७०७००७५८

**मूल्य: ₹ ३००**

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. शिवकुमार सोनाळकर, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी देशमाने ऑफसेट, औद्योगिक वसाहत, पलूस येथे छापून अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११ येथे प्रकाशित केली. या प्रत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

| | | |
|---|---|---|
| लोकनाटय कलांचे बदलते स्वरूप : लोकनाटय तमाशा | युवराज तानाजीराव खरात | १६१ |
| कोरकू आदिवासींचे विधीनाट्य : खाम | डॉ.धनंजय महादेव होनमाने | १६५ |
| लोकसाहित्य आणि ललित साहित्य यांचा अनुबंध | डॉ. उदय रामचंद्र जाधव | १६९ |
| स्त्रीमनाचे उत्कट आविष्कार: 'उखाणे ' | डॉ.मानसी जगदाळे | १७३ |
| लोकसाहित्याचा मौखिक आविष्कार : लोकगीते | डॉ.कदम संभाजी धोंडीराम | १७७ |
| लोकपरंपरेतील लोककथागीतांचे स्वरूप विशेष | डॉ.अमर कांबळे | १८१ |
| लोककला सोंगीभजन : बदलती आविष्कार रुपे | निवृत्ती दत्तू कार्वेकर | १८५ |
| आदिवासी लोकगीतांमधील स्त्रीग दर्शन | केशव धोंडिबा टिपरसे | १८८ |
| कीर्तन परंपरेचे स्वरूप व सद्यस्थिती | भारती श्रीधर कोळेकर | १९१ |
| महाराष्ट्रातील आदिवासींची लोकनृत्ये: भवाडा आणिदंडार | प्रियांका अशोक कुंभार | १९४ |
| संत एकनाथांच्या भारूडातील लोकाविष्कार | सौ.शुभांगी तानाजी कुंभार | १९८ |
| हादगा गीतातील स्त्रीसंवेदना | डॉ. लता पांडुरंग मोरे | २०१ |
| महाराष्ट्रातील सण–उत्संव परंपरा–अध्यात्म् व वैज्ञानिकता | लक्ष्मी पवार | २०४ |
| प्रयोगरूप लोककलांचा सृजनात्मक आविष्कार | डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | २०७ |
| गजीढोल: एक लोकाविष्कार | संतोष लोंढे | २११ |
| भारतीय व पाश्चात्य लोकसंस्कृतीच्या आविष्कार रूपांमधीलअनुबंध | डॉ.स्नेहा सुवास प्रभु महांबरे | २१३ |
| जात्यावरच्या ओव्या–स्त्रीमनाचा भावनाविष्कार | डॉ.सविता अशोक माळी | २१८ |
| मराठी लोकनाटयाची परंपरा व अभिव्यक्तीचे वेगळेपण | प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे | २२२ |


 ISSN No. 2319-6025

# प्रयोगरूप लोककलांचा सृजनात्मक आविष्कार

**डॉ. विशाल प्रकाश लिंगायत**
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय,
बार्शी, ता.- बार्शी, जि. सोलापूर

प्रस्तावना :

महाराष्ट्रातील लोकनाटयाचा किंवा प्रयोगात्मक आविष्कारांचा आढावा घेतला तर भक्ती, प्रबोधन आणि रंजन अशा तीन पातळयांवर लोकनाटयांनं जनमानसावर आपला प्रभाव पाडला आहे. लोककलांचा आविष्कार हा सामान्यतः लोकसमूहाद्वारे होतो. जेव्हा तो आविष्कार वैयक्तिकरीत्या होतो, तेव्हा त्याचे स्वरूप अंशतः वैयक्तिक असले तरी त्या आविष्काराच्या पाठीमागील भावना ही समूहमनाच्या आविष्काराचीच असते. सामाजिक जाणिवेतून लोककलांची निर्मिती होते. या सामाजिक जाणीवा शतकानुशतके जिवंत ठेवण्याचे काम या लोककला करतात. लोककलाविष्कारातून त्या समाजाचे मनोविचार आणि मनोविकार प्रतिबिंबीत होतात, म्हणून मानवी जीवनातील जाणीव-विचारांचे सम्यक दर्शन घडविणारा आरसा म्हणून लोककलांचे महत्त्व अधिक वाढते. ''महाराष्ट्राच्या कानाकोपर्याहत आजही धार्मिक विधींच्या निमित्ताने प्रयोगरूप कलाप्रकार सादर केले जातात. मरीआई, दंडार, बहुरूपी, चित्रकथा, दशावतार, बोहाडा इ. प्रयोगरूप कलाप्रकार अस्तित्वात आहेत.''२

**समाजदर्शन घडवणारे लोककला प्रकार :**

समाजदर्शन घडवणार्या लोककला प्रकारांत धार्मिक विधींशी निखळपणे निगडीत असलेल्या लोककला म्हणजे लग्न, मुंज अशा कार्यक्रमांच्यावेळी अग्रक्रमाने पार पाडला जाणारा, देवीच्या उपासनेचा गोंधळ, खंडोबाच्या उपासनेचे जागरण, ज्योतिबाच्या उपासनेचे भारूड यांसारखे लोककला प्रकार धार्मिकविधी म्हणून सादर केले जातात. 'लोककला' हया लोकश्रध्देपासून आणि लोकविधींपासून वेगळ्या काढता येत नाहीत. त्यामुळे भारतीय लोकश्रध्दांचे, सामाजिक समजूतीचे, आचारविधीचे, रूढी-परंपरांचे, पुराणकथा, संत-पंत-तंत साहित्य या सर्वांच्या संचिताचा वारसा आपल्याला लोककलांमध्ये दिसतो. म्हणून लोककला हया सांस्कृतिक संचिताचा मूर्त आविष्कार होतो असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही.

**गोंधळ :**

महाराष्ट्राच्या लोकधर्मात आणि देवकर्मात 'गोंधळ' हा एक अत्यंत वैशिष्टयपूर्ण आणि कुळाचाराची प्रतिष्ठा प्राप्त झालेला नाटयरूप, धार्मिक विधी आहे. ''आज गोंधळ हे लोकधर्मिय विधीविधान रेणुका आणि तुळजाभवानी या दोन देवींच्या उपासनेशी निगडीत आहे.''३ 'गोंधळी' या जमातीचे लोक तुळजाभवानी वा रेणुकामाता या दोन आदिशक्ती दैवतांचा जो कुळाचार पार पाडतात त्याला 'गोंधळ' असे म्हणतात. 'गोंधळ' हा रात्रभर चालणारा देवीच्या कुळाचाराचा विधी आहे. महाराष्ट्राच्या लोकजीवनात, लोकपरंपरेत, लोकधर्मात आणि देवधर्मात मोलाचे स्थान असलेला गोंधळ हा आदिशक्तीच्या उपासनेचा आणि पूर्वजांच्या पराक्रमाचे स्मरण करून देणारा लोककला

ISSN No. 2319-6025

**वाघ्या-मुरळी :**

महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेश या तीन राज्यात 'खंडोबा' ह्या क्षेत्रपाल देवतेच्या उपासनेशी निगडीत अशी ही लोककला आहे. आदिशक्तीचे उपासक जसे गोंधळी, तसेच खंडोबाचे उपासक वाघ्या-मुरळी असतात. महाराष्ट्राच्या लोकरंगभूमीवर वाघ्या आणि मुरळी आपली लोककला जागरणाच्या माध्यमातून सादर करतात. वाघ्या स्वतःला खंडोबाचा चेला समजतो. खंडोबाची गाणी गात आणि खंडोबाच्या नावाने भिक्षा मागत फिरणारे वाघे आणि मुरळया सर्वत्र दिसतात. वाघ्या-मुरळी हे धार्मिक कुळाचाराचा घटक असलेले लोककलावंत. वाघे व मुरळया सर्व दक्षिण महाराष्ट्रात आढळतात.

**निष्कर्ष :**

१ प्रयोगरूप लोककलेतून घडणार्या समाजदर्शनाचा आविष्कार हा मानवी भावभावनांचे सौंदर्यात्मक प्रतिबिंब होय.

२ लोककलांचा मूळस्त्रोत भारतीय संस्कृतीत आहे.

३ लोककला हे महाराष्ट्राने जतन केलेलं मौल्यवान ऐश्वर्य आहे. ग्रामीण भागातील प्रदेशात मनोरंजनासाठी आणि प्रबोधनासाठी या लोककलांचा जन्म झाला.

४ महाराष्ट्राची जडणघडण करण्यात या लोककलांचा मोठा वाटा आहे.

५ धर्मश्रद्धा हा लोकनाटयाचा मूलाधार होता. हे लक्षात घेतल्याशिवाय प्रयोगात्मक लोककलांचा विचार करताच येणार नाही.

६ 'तमाशा' ही रंजनप्रधान लोककला असली तरी समकालीन वास्तव्यांतील विसंगतींचे थेट दर्शन या कलेतून घडते.

७ महाराष्ट्राच्या लोकरंगभूमीवर खेळल्या जाणार्या बहुतेक सर्व लोककला प्रकारांना परंपरा आणि श्रध्देचे एक अधिष्ठान आहे.

**संदर्भटीपा :**

१. कांवळे बळवंत, देवदासी, पोतराज, वाघ्या - मुरळी:रूप-स्वरूप-विकृती, पद्मगंधा प्रकाशन - पुणे, जून-२००८, प्र.आ., पृ.-१७.

२. प्रा. डॉ. देशमुख महादेव, प्रयोगरूप लोककला प्रकार परंपरा आणि स्वरूप, लक्ष्मीबुक-सोलापूर, ऑक्टो.-२०१३, प्र.आ., पृ.-१७.

३. डॉ. ढेरे रा. चिं., लोकसंस्कृतीची क्षितिजे, विश्वकर्मा साहित्यालय, टिळकपथ पुणे, प्र.आ., ऑगस्ट -१९७१, पृ.- ३३.

४. डॉ. ढेरे रा. चिं., संतसाहित्य आणि लोकसाहित्य, श्रीविद्या प्रकाशन -पुणे,जुलै - १९७८, पृ.-१३५.

५. डॉ. देखणे रामचंद्र,महाराष्ट्राची सांस्कृतिक लोककला,पद्मगंधा प्रकाशन-पुणे,पृ.-५.

६. प्रा. डॉ. देशमुख, उ.नि. २, पृ.- ४३.

७. डॉ. जाधव सुदाम, लोकनाटयस्वरूप, सुलबा प्रकाशन - औरंगाबाद, ऑगस्ट - १९९२, पृ,१६.

 ISSN No. 2319-6025